# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
# ग प्रभाग कार्यालय
# कार्यपत्रिका क्रमांक - ५
# सभावृत्तांत

दिनांक - ४/०९/२०१९ वेळ - सकाळी ११ :०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **ग** प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि.४/९/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे **"ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह"** येथे आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.बारणे अर्चना तानाजी – सभापती
२. मा.कदम निकीता अर्जुन
३. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
४. मा.डब्बु आसवानी (हिरानंद)
५. मा.पवार मनिषा प्रमोद
६. मा.अभिषेक गोविंद बारणे
७. मा.कैलास ऊर्फ बाबा भालचंद्र बारणे
८. मा.निलेश हिरामण बारणे
९. मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन
१०. मा.सविता बाळकृष्ण खुळे
११. मा.सुनिता हेमंत तापकीर
१२. मा.चंद्रकांत बारकु नखाते
१३. मा.संदिप काशिनाथ गाडे - स्विकृत सदस्य
१४. मा.गोपाळ काशिनाथ माळेकर – स्विकृत सदस्य
१५. मा.विनोद हनुमंत तापकीर - स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

श्रीमती स्मिता झगडे – क्षेत्रिय अधिकारी, श्री रमेश वस्ते - प्रशासन अधिकारी, श्री.व्ही.एम.गायकवाड – मुख्य लिपिक, श्रीमती अमृता लागु - लेखाधिकारी, श्री.एस.डी.निंबाळकर – आरोग्य निरीक्षक, श्री.गट्टुवार – कार्यकारी अभियंता, श्री.ओंभासे – कार्यकारी अभियंता, बीआरटीएस, श्री.विनय ओहोळ – उपअभियंता, स्थापत्य, श्री.विजयकुमार काळे – उपअभियंता, स्थापत्य,श्री.अतुल जोशी – कनिष्ठ अभियंता स्थापत्य,श्री.बाबासाहेब गलबले – कार्यकारी अभियंता,विद्युत, श्रीमती अनुश्री कुंभार – उपअभियंता विद्युत, श्री.पी पी पाटील – कार्यकारी अभियंता,श्री.मोने उमेश – उपअभियंता,जलनि:सारण, श्री.बोरसे एम डी, श्री.रोकडे जयवंत, श्रीमती गोखले एस एन – कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, श्री सतिष तायडे– कनिष्ठ अभियंता,विद्युत, , श्री.बंडगर एस बी – कनिष्ठ अभियंता,जलनि:सारण, श्रीम.सानप ए.व्ही, श्री.कोरेवार, श्री.गजपुरे व्ही पी, कलाल आय के – कनिष्ठ

अभियंता,स्थापत्य, श्री.नरोटे एस एस – उपअभियंता, स्थापत्य उद्यान श्री.कदम सी.टी – मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय, थेरगाव ,श्री.डी.एन.गायकवाड – उद्यान अधिक्षक,श्री.जे.व्ही.पटेल – सहा.उद्यान अधिक्षक, इ.कर्मचारी उपस्थित होते.

-----

सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत आली.

दि.४ /९/२०१९ रोजीचे मासिक सभेचा सभावृत्तांत ( कार्यक्रम पत्रिका क्र.४ ) कायम करणेत आला.

ठराव क्रमांक - ११ विषय क्रमांक - १

दिनांक- ०४/०९/२०१९

सूचक- मा.अभिषेक बारणे अनुमोदक- मा.कैलास बारणे

**संदर्भ –** मा.क्षेत्रिय अधिकारी ग क्षेत्रिय कार्यालय यांचे जा.क्र.गप्र/वि/१/११२/२०१९ दि.२९/०७/२०१९ चे पत्र

मा.क्षेत्रिय अधिकारी ग क्षेत्रिय कार्यालय यांचे जा.क्र.गप्र/वि/१/११२/२०१९ दि.२९/०७/२०१९ चे पत्रानुसार ग क्षेत्रिय कार्यालयाकरीता आवश्यकतेनुसार विद्युतीकरणाचे काम करणेकामी प्रस्तुतचे र.रु.१०,००,०००/- फक्त पर्यंतचे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे येणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर विषय मंजुर करणेत येत आहे.

-----

ठराव क्रमांक - १२ विषय क्रमांक - २

दिनांक- ०४/०९/२०१९

सूचक- मा.कैलास बारणे अनुमोदक- मा.सविता खुळे

**संदर्भ –** मा. संदिप वाघेरे यांचे दिनांक १६/०८/२०१९ चे पत्र

मा.संदिप वाघेरे यांचे दिनांक १६/०८/२०१९ चे पत्रानुसार प्रभाग क्र.२१ मधील जिजामाता हॉस्पिटलचे नुतनीकरण करण्यात आले आहे. सदर ठिकाणी बाल शिवाजी व जिजाऊ मॉंसाहेब (शिवनेरी किल्ल्यावरील प्रतिकृती) यांचा पुतळा माझ्या वतीने महानगरपालिकेस भेट स्वरुपात देण्याचा मानस आहे. तरी सदरील पुतळा महापालिकेमार्फत जिजामाता हॉस्पीटलच्या आवारामध्ये सुशोभीकरण करुन बसविण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर विषय मंजुर करणेत येत आहे.

-----

ठराव क्रमांक - विषय क्रमांक - ३

दिनांक- ०४/०९/२०१९

सूचक- मा. अनुमोदक- मा.

**संदर्भ –** मा.झामाताई बारणे यांचे दिनांक ५/०८/२०१९ चे पत्र

मा.झामाताई बारणे यांचे दिनांक ५/०८/२०१९ चे पत्रानुसार प्रभाग क्र.२४ येथील वाकड पोलिस स्टेशन ( आयईवना सोसायटी) समोरील चौकास लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे नाव देण्यात यावे. थेरगाव डांगे चौक येथील बीआरटी रस्त्यावरील उड्डाणपुलावर छत्रपती श्री शिवाजी महाराज यांचे नाव दिलेले आहे, सदर परिसर (चौक) डांगे चौक या नावाने संपुर्ण शहरात ओळखला जातो. तरी पुलावरती डांगे चौक नावाचा उल्लेख करावा, सदर दोन्ही ठिकाणाचे नावाचे फलक तयार करुन लवकरात लवकर लावण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदर विषय तहकुब करणेत येत आहे.

-----

## सभा कामकाजात ऐनवेळी दाखल करुन घेणेत आलेले विषय खालीलप्रमाणे

ठराव क्रमांक - १३ विषय क्रमांक - ४

दिनांक- ०४/०९/२०१९

सूचक- मा.अर्चना बारणे अनुमोदक- मा.मनिषा पवार

संदर्भ – मा.अर्चना बारणे यांचे दिनांक ४/०९/२०१९ चे पत्र

मा.अर्चना बारणे यांचे दिनांक ०४/०९/२०१९ चे पत्रानुसार मा.ग क्षेत्रिय कार्यालयातील सभागृहास श्री.बापुजी बुवा सभागृह असे नामकरण करण्यात आले असुन, सदर सभागृहामध्ये मा.बापुजी बुवा यांचे छायाचित्र लावण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर विषय मंजुर करणेत येत आहे.

-----

ठराव क्रमांक - १४ विषय क्रमांक - ५

दिनांक- ०४/०९/२०१९

सूचक- मा.चंद्रकांत नखाते अनुमोदक- मा.सुनिता तापकीर

संदर्भ – मा.चंद्रकांत नखाते यांचे दिनांक ४/०९/२०१९ चे पत्र

मा.चंद्रकांत नखाते यांचे दिनांक ०४/०९/२०१९ चे पत्रानुसार प्रभाग क्र.२७ मधील नखाते नगर स.नं. ३२ मधील पाच कॉलनीला आज पर्यंत अधिकृत नाव देण्यात आलेले नाही. तरी स.नं.३२ मधील पश्चिमेकडुन – उत्तरेकडे अनुक्रमे निसर्ग कॉलनी नं.१, निसर्ग कॉलनी नं.२, निसर्ग कॉलनी नं.३, निसर्ग कॉलनी नं.४ व निसर्ग कॉलनी नं.५ असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर विषय मंजुर करणेत येत आहे.

-----

ठराव क्रमांक - १५ विषय क्रमांक - ६

दिनांक- ०४/०९/२०१९

सूचक- मा.बाबासाहेब त्रिभुवन अनुमोदक- मा.उषा वाघेरे

संदर्भ – मा.कैलास बारणे यांचे दिनांक ४/०९/२०१९ चे पत्र

मा.कैलास बारणे यांचे दिनांक ०४/०९/२०१९ चे पत्रानुसार मौजे थेरगाव सि.स.नं.२११७ पासुन मंजुर विकास योजनेतील १२ मी.रुंद रस्त्यापासुन उत्तरेकडील ९ मी.रुंद रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका कलम २०५ अंतर्गत घोषित करण्यात यावा. त्यामुळे नागरिकांना २४ मी.रस्तापर्यंत जाता येईल. मौजे थेरगाव येथील गावठाणातील नागरिकांना मुख्य २४ मी.रस्त्यावर येणेसाठी कलम ३० अंतर्गत १२ मी.रस्ता प्रस्तावित केलेला आहे. सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

सदर विषय मंजुर करणेत येत आहे.

-----

ठराव क्रमांक - १६ विषय क्रमांक - ७
दिनांक- ०४/०९/२०१९
सूचक- मा.बाबासाहेब त्रिभुवन अनुमोदक- मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.कैलास बारणे यांचे दिनांक ४/०९/२०१९ चे पत्र

मा.कैलास बारणे यांचे दिनांक ०४/०९/२०१९ चे पत्रानुसार प्रभाग क्र.२३ थेरगाव बिरला हॉस्पिटल,मोरया मंगल कार्यालया समोरील चौकास श्री राघवेंद्र स्वामी मार्ग असे नामकरण करणेस मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर विषय मंजुर करणेत येत आहे.

-----

ठराव क्रमांक - १७ विषय क्रमांक - ८
दिनांक- ०४/०९/२०१९
सूचक- मा.बाबासाहेब त्रिभुवन अनुमोदक- मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.कैलास बारणे यांचे दिनांक ४/०९/२०१९ चे पत्र

मा.कैलास बारणे यांचे दिनांक ०४/०९/२०१९ चे पत्रानुसार प्रभाग क्र.२३ येथील ड्रायव्हर कॉलनी थेरगाव काळेवाडी फाटा येथे मदरसा दावते इस्लाम मक्का मस्जीद आहे. त्याचे नाम फलक लावणे आहे, तरी सदर जागेवर तो नामफलक बसविण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर विषय मंजुर करणेत येत आहे.

-----

**अध्यक्ष**
**ग प्रभाग समिती**
**थेरगाव– ३३.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव - ३३
क्र-गक्षेका/कावि/४/४६/२०१९
दिनांक - १९/०९/२०१९

**प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)**
**क्षेत्रीय कार्यालय,**
**थेरगाव – ३३**

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

२/- आपले विभागाशी संबंधित असणा-या विषयाबाबत झालेल्या ठरावानुसार नियमाधीन कार्यवाही करणेत यावी, यासंदर्भात वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही.